महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,

ई-मेल - desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १०/एनजीपी/मान्यता/डी. फार्मसी/२०२२/ ११३

दिनांक : 01 FEB 2023

प्रति,
प्राचार्य,
श्री साईनाथ कॉलेज ऑफ फार्मसी,
४६, साई व्हॅली, अमरावती रोड,
डवळामेथी, नागपूर-४४००२३.

[4209]

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.**

**संदर्भ : १.उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०२१/(प्र.क्र.९२/२१)तांशि-५, दिनांक : १.९.२०२१.**

**२. आपले पत्र क्रमांक : SSCOP/८७७/२०२२, दिनांक : २८.६.२०२२.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून आपल्या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रवेश क्षमतेसह कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून शासन मान्यता दिलेली आहे.

परंतु आपल्या संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे संलग्नता प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत आपल्या संस्थेचा समावेश करण्यात आलेला नाही. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत आपण संदर्भ क्रमांक २ नुसार कळविले आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून आपल्या संस्थेस कायम विनाअनुदान तत्वावर खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास संचालनालयाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | अभ्यासक्रमाचा स्तर | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | डीप्लोमा इन फार्मसी | पदविका | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कायम विनाअनुदान तत्वावर विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याच्या अनुषंगाने मुदतठेव म्हणून रु. ३.०० लाख, खाते क्र. १४६३१३००६४४५, दिनांक : ६.७.२०२२ अन्वये, आयसीआयसीआय बँक लि., शाखा नागपूर इतवारी, येथे संस्था व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी ठेवलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीसह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून आपल्या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या कायम विनाअनुदानित संस्थेत नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेस विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास, विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच शासनाच्या मानकांप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था व संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करतील.
३. संस्थेने प्रवेशासाठी औषधनिर्माणशास्त्र पदविका [D. Pharmacy] अभ्यासक्रमाची तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.
४. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया यांना राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने माहितीसाठी सादर.

प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेशित :
१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर.
४. कार्यासन क्रमांक ३, (आयटी सेल), मुख्य कार्यालय, मुंबई.